## प्रास्ताविक

समाजाच्या विकासात साहित्याची आपली स्वत:ची अशी भूमिका असते. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र अशी साहित्याची अनेकविध रूपे आढळतात. आशयानुरूप वेगवेगळ्या पद्धतींच्या अभिव्यक्तींनी असे साहित्यप्रकार रूढ होत जातात. या साहित्यप्रकारातून त्या-त्या देशातील-प्रदेशातील जनजीवन, आचार-विचार, रूढी-परंपरा, संस्कृती भूतकाळात घडलेल्या घटनांची ओळख होत असते. कथा हा गद्यसाहित्याचा स्फूट प्रकार असून समाजातील घटनांचे प्रतिबिंब यातून घडते. म्हणूनच साहित्याला समाजाचा आरसा असेही म्हटले जाते.

चित्रपट या स्वतंत्र कलेचा विचार करता चित्रपट ही वैज्ञानिक युगाची देणगी आहे. मानवाच्या सर्वांगीण उन्नतीबरोबर त्याच्या भौतिक जीवनामध्ये वाढ झाल्यानंतर साहजिकच तांत्रिक प्रगतीच्या जोरावर तो विलासी जीवनाकडे वळू लागला. आणि यांत्रिकीकरणाबरोबर करमणुकीच्यादेखील विविध साधनांचा शोध तो घेऊ लागला. यातूनच चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमाचा शोध लागला. माणसाची करमणूक करणाऱ्या विविध साधनापैकी सिनेमाने अत्यंत झपाट्याने संपूर्ण जगाला वेढले आहे. जगात सुमारे तीन हजार वर्षांपासून नाटके होत आहेत परंतु अवघ्या काही वर्षापूर्वी निर्माण झालेल्या सिनेमाने मानवी मनावर, नाटकांच्या शेकडो पटीने जास्त प्रभाव पाडलेला आहे. पृथ्वीतलावर मानवाला आकर्षित करणाऱ्या साहित्य, चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य या कलांत चित्रपटकलेने त्याच्या मनाला भुरळ घातलेली आहे. आज चित्रपट क्षेत्र विस्तारीत झाले असले तरी त्याचा मूळ पाया साहित्य हेच आहे. साहित्याप्रमाणेच चित्रपटातही समाजातील विविध घटनांची माहिती मिळते. चित्रपटातून बऱ्याचदा समाजात घडणाऱ्या घटनाक्रमाचे तत्कालिन परिणाम दाखवले जातात. म्हणूनच साहित्य आणि चित्रपट हे एकमेकास

पूरक असून ते समाजाशी जोडलेले दिसतात. साहित्य आणि चित्रपट यांचा संबंध तितकाच जुना आहे जितका स्वत: चित्रपट जुना आहे.

साहित्यात जेव्हा लेखक एखाद्या घटनेने प्रभावित होऊन साहित्यनिर्मिती करतो तेथेच चित्रपट दिग्दर्शक त्या साहित्यकृतीला नवीन रूपात दाखविताना दिसतो. ज्यामुळे ती साहित्यकृती अधिक जिवंत स्वरूपात प्रकटते. बऱ्याचदा ती साहित्यकृती साहित्यिक रूपात अनेक लोकांपर्यंत पोहचू शकत नाही परंतु चित्रपट माध्यमाद्वारे पोहचताना दिसते.

साहित्यकृतींवर आधारित चित्रपटांचा विचार करता साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक या वाङ्मय प्रकारांवर बरेच चित्रपट बेतलेले दिसतात. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

**१. कादंबरीवर आधारीत चित्रपट**

- व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' कादंबरीवर आधारित त्याच नावाचा चित्रपट आहे.
- श्याम मनोहरांच्या 'शीतयुद्ध सदानंद' कादंबरीवर आधारित 'लिमिटेड माणुसकी' चित्रपट.
- नाथमाधव यांच्या 'डॉक्टर' कादंबरीवर आधारित 'शिकलेली बायको' चित्रपट.
- बाबा कदमांच्या 'पद्मजा' कादंबरीवर आधारित 'ज्योतिबाचा नवस' चित्रपट.
- ना. ह. आपटे यांच्या 'न पटणारी गोष्ट' कादंबरीवर आधारित 'कुंकू' हा मराठी चित्रपट व 'दुनिया न माने' हा हिंदी चित्रपट आहे.
- शांता मिसळ यांच्या 'बेघर' कादंबरीवर आधारित 'उंबरठा' हा चित्रपट.

**२. नाटकावर आधारित चित्रपट**

- विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे !' नाटकावर त्याच नावाचा चित्रपट.
- जयवंत दळवींच्या 'बॅरिस्टर' नाटकावर 'रावसाहेब' चित्रपट.
- देवलांच्या 'शारदा' नाटकावर 'शारदा' चित्रपट.
- प्र. के. अत्रे यांच्या 'लग्नाची बेडी' नाटकावर 'ब्रम्हघोटाळा' चित्रपट.
- 'गो. ब. देवल यांच्या 'संशय कल्लोळ' नाटकावर 'तसवीर' हिंदी चित्रपट.

**३. कथेवर आधारित चित्रपट**

- दिनकर पाटलांच्या 'वाघ्या-मुरळी' कथेवर 'जय मल्हार' चित्रपट.
- वि. वि. बोकील यांच्या 'मंगळागौरीच्या रात्री' कथेवर 'पहिली मंगळागौर', चित्रपट.
- य. गो. जोशींच्या 'वहिनीच्या बांगड्या' आणि 'शेवग्याच्या शेंगा' या कथांवर त्याच नावाचे चित्रपट.
- चि. वि. जोशींच्या 'चिमणरावांचे चऱ्हाट' मधील 'लग्नसराई' आणि 'बोळवण' कथांवर 'लग्नं पहावं करून' चित्रपट.
- 'श्रीमंताचे बोलावणे ' या चि. य. मराठ्यांच्या कथेवर 'अमरभूपाळी' हा चित्रपट.

साहित्यकृतीवर आधारित चित्रपटाची ही काही उदाहरणे यातील 'कथा' या साहित्यप्रकारावर आधारित चित्रपटाचा अभ्यास करावयाचा आहे. कथेचा आवाका लहान असल्याने त्यावर दोन-तीन तासांचा चित्रपट निर्माण करताना त्यात बदल अपरिहार्य ठरतो. कथेला चित्रपटाच्या साच्यात बसविताना मूळ कथेच्या आशयातही बदल होत असतो. कथेचे चित्रपटामध्ये रूपांतर होताना त्यात नवनवीन घटनाप्रसंग येतात, काही दृश्ये मूळ कथेपासून निराळ्या स्वरूपात समोर

येतात, प्रसंग मागेपूढे होतात, व्यक्तिचित्रणात बदल होतात किंवा व्यक्तिरेखांची वाढ केली जाते. या सर्व बदलामुळे कथेचा आकार, व्याप्ती मूळ स्वरूपाहून भिन्न होते. यावरून असे म्हणता येईल की, एखाद्या कथेवर चित्रपट बनविताना लेखकाच्या मूळ रचनेत बरेच बदल घडत असतात.

श्री. दा. पानवलकरांच्या 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट यांचा चिकित्सक अभ्यास करताना कथेचे चित्रपट रूपांतर होताना वरील बदल कशा स्वरूपात झालेले आहेत याचा आढावा प्रस्तुत लघुप्रबंधात घ्यावयाचा आहे.